सं.फौ.ख.क्र.७७९/२०२२
सरकार वि.राजु
नि.क्र.११ च्या खाली

साक्षीदार क्र **०६** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–सुर्यभान मारोती मडावी,
वय ४० वर्ष, व्यवसाय–शेती
राह.मुरादपुर, ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू</u>**

१. अपघात झाल्याबाबत मला गावातुन माहिती आहे. सदर अपघात झाल्यानंतर मला माहिती झाले होते. आपघातानंतर मी बेला येथे गेलो होतो. अपघात स्थळावर गेलो असता जखमीला दवाखाण्यात नेले होते. त्यानंतर जखमीला बेला येथुन नागपुर येथे उपचाराकामी नेले. अपघात झाल्यामुळे जखमीला दुखापत झाली होती. सदरचा अपघात हा देशमुख याने केल्याबाबत मला माहिती झाले होते. याव्यतिरिक्त मला काही माहिती नाही.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड. पि.वाय.सुखदेवे यांनी नि.क्र.१८ वर मेमो दाखल केला त्याप्रमाणे यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरू.</u>**

२. पोलिसांनी माझे बयाण घेतले नव्हते. मी पोलिसांना बयाण देतेवेळेस मला गावातुन घटनेबाबत माहित पडले, त्यानंतर मी घटनास्थळावर गेलो, बेला येथुन उपचाराकरिता नागपुर येथे नेले, जखमीला दुखापत झाली होती या बाबी पोलिसांना सांगितल्या नव्हत्या. घटनेच्या वेळी मी माझ्या गावी हजर होतो, त्यामुळे घटना ही कोणाच्या चुकीमुळे घडली मला माहिती नाही. जखमी आयुष मडावी हा माझा मुलगा आहे. हे म्हणणे खरे नाही की, जखमी आयुष हा माझा मुलगा असल्यामुळे मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.११.०२.२०२६

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड